[redacted]

# *हव्यासाची ऐशी तैशी*

- सुषमा दातार

"यंदा हिवाळा फारसा जाणवलाच नाही.एकदम उन्हाळाच आलाय" किंवा "यंदा पावसाला वेडच लागलंय दिवाळीत थंडी पडता पडता वळवा सारखा पाऊस म्हणजे काय म्हणायचं?" असले शेरे आता सातत्यानं कानावर येतात.वायफळ चर्चेची ही गाडी,कॉफीच्या वाफाळ कपात थंडीला बुडवत चालू राहते. हवामान बदल, पाणी टंचाई,वाढती महागाई,शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या,जागतिक मंदी अशी स्टेशनं घेत कुठल्याकुठं जाते.या सगळ्याला आपणही जबाबदार आहोत याचा उल्लेखही न करता.कारण या सगळ्याची प्रत्यक्ष झळ न लागलेल्यांना त्याची जाणही नसते.असली तरी त्याबद्दल आपल्याला ताबडतोबीनं काही करता येतं हे जाणवत नाही.जाणवलं तरी अंगी मुरत नाही आणि मग गरज नसताना जुना फेकून नवा मोबाईल घेतला जातो,कंटाळा आला म्हणून जुनं फर्निचर काढून घर रिनोव्हेट होतं,भाजी घ्यायलाच घराबाहेर पडलं असून पिशवी न नेल्याचं आणि प्लॅस्टिकची पिशवी मागितल्याचं काही वाटत नाही." एकानं बदलून काय होणार "असा शेरा मारून अंगचोरपणा करतोय हेही लक्षात येत नाही.पण अशांना गदा गदा हलवून जागं करणारी आणि ठोस पावलं उचलायचा उद्युक्त करणारी मंडळी आता सक्षम होताना दिसताहेत. अधुनिक संपर्कसाधनांचा अचूक वापर करताहेत.

अशाच प्रयत्नांतलं एक पाऊल म्हणजे "लाख मालाची गोष्ट "."स्टोरी ऑफ स्टफ" चं मराठी रूपांतर. ते केलं आहे अवकाशनिर्मिती या संस्थेनं आणि निर्मिती आहे अरविंद गुप्ता यांची.दुकानदारी-खरीदारीच्या चक्रात धावणाऱ्यांना ब्रेक लावून विचार करायला लावणारा हा २० मिनिटांचा लघुपट.भेदक पध्दतीनं मांडतो उपभोगाचा अतिरेक आणि भौतिकतेचं अर्थकारण.पोटतिडकीनं तरीही सोपं असं बोलबोल बोलणारी ॲनी लिओनार्ड आपल्याला दिसते आणि मागे अगदी साध्या काळ्या रेषाकृतींचं ॲनिमेशन.मुख्य सहा आकृत्या आहेत. झाडं,डोंगर,पाणी असलेली पृथ्वी- माल उत्पादनाचा कारखाना-विक्रीसाठी मॉल-उपभोग घेण्याची जागा :घर-कचऱ्याची विल्हेवाट लावणारी भट्टी असं एका रेषेत येतं.या सगळ्यांच्या वर सरकार आणि बड्या कंपन्यांचं प्रतिक.ही चित्रं जरूर तेव्हा ॲनीला वगळून चौकटभर दिसतात.पण ॲनीचं लक्षवेधी बोलणं थांबत नाही.(मराठी रूपांतरात पर्ण पेठेचा आवाज लिपसिंक नसूनही चपखल बसतो.)तंत्रज्ञानाचा अनावश्यक वापर टाळायला हवा असा एक संदेश चित्रपट देतोच त्याच्याशी हे साधं ॲनिमेशन सुसंगतच ठरतं.

टाईड्स फौंडेशन,फंडर्स वर्क ग्रूप फॉर सस्टेनेबल प्रॉडक्शन ॲंड कन्झम्शन,फ्री रेंज स्टुडिओ यांच्या बरोबर ॲनी लिओनार्ड हिनं हा चित्रपट तयार केला.त्यामागे तिचा १० वर्षांचा अभ्यास,ग्रीन पीस इंटरनॅशनल सारख्या,पर्यावरणाशी संबंधित समाजसेवी संस्थांबरोबर काम करण्याचा अनुभव आणि प्रगत- अप्रगत देशांच्या भटकंतीमधून मिळालेला माहितीचा साठा आहे.४ डिसेंबर २००४ ला 'स्टोरी ऑफ स्टफ' इंटरनेटवर अवतरला. तेव्हापासून आता पर्यंत www.storyofstuff.org या साईटला२२४ देशांतल्या करोडो लोकांनी भेट दिली आहे.अनेक देशांतल्या विविध भाषांमध्ये या लघुपटाचं डबिंग झालं आहे.त्यामुळे मुळात अमेरिकनांना पुकारणारा हा लघुपट अनेकांना आपलीच गोष्ट सांगणारा वाटतोय.पर्यावरणाचं रक्षण करीत , मानवतेच्या पायावर उभं असलेलं शांततामय सहजीवन साकारण्याची आस असणाऱ्या सगळ्यांनाच तो जागं करतो आहे.अर्थातच कौतुकाबरोबर यातल्या काही आकडेवारी बद्दल,माहितीच्या विश्वासार्हते बद्दल आणि प्रचारकी धाटणीबद्दल अभ्यासपूर्ण टीकाही होते आहे.तीही नेटवर जरूर वाचावी अशी आहे.

"आपण वापरून फेकून देतो त्या वस्तू जातात कुठे ? पण त्या आधी विचारायला हवं येतात कुठून ? " अशा प्रश्नापासून ॲनी वस्तूंची गोष्ट सुरू करते.पृथ्वी,कारखाने,विक्रीची जागा,वापराची जागा म्हणजे घरं, टाकलेल्याला नष्ट करायची जागा अशी एकरेषीय प्रक्रियेची प्रतिक-चित्रं ॲनीच्या मागे दिसतात.ही व्यवस्था ठीकठाक चालली आहे असं वाटत असलं तरी तसं नाहिये हे ती ठासून सांगते.मग म्हणते "या चित्रांमध्ये माणसं घातली म्हणजे खरं काय चाललं आहे ते कळेल तर प्रथम सरकारा पासून सुरू करूया.अनेकांना

वाटतं अमेरिकन सरकारचं प्रतीक म्हणून मी रणगाडा वापरला पाहिजे.पण मी माणूस वापरणार आहे.कारण सरकारं ही लोकांनी लोकांसाठी चालवलेली असली पाहिजेत."(अशा सेन्स ऑफ ह्युमर साठी मात्र अमेरिकनांचं कौतुक करावं लागेल.)सरकारच्या प्रतिकाजवळ बड्या जागतिक कंपन्यांचं प्रतीक उमटतं- पोटावर डॉलर चिन्ह असलेला लठ्ठ माणूस.मग त्यांचं सरकारांपेक्षा अधिक असलेलं बळ दर्शविण्यासाठी सरकारी माणूस कंपन्याचे बूट पुसताना दिसतो.तिथे आपल्याला पक्कंच कळतं की हा लघुपट फक्त वस्तूंची गोष्ट सांगणार नाही तर बड्या कंपन्या आणि त्यांच्या कारभाराचीही माहिती देणार आहे.त्यांच्यावर भेदक टीकाही करणार आहे.ही माणसांचीही गोष्ट असणार आहे, जी जास्त महत्वाची असतात आणि ज्यांचा आवाजही इतरांपेक्षा अधिक असतो.

मग भौतिकतेच्या अर्थशास्त्राची पहिली पायरी विशद होते- 'उपसा'.पृथ्वीच्या चित्रातल्या झाडं,खनिजं, पाणी यावर काट मारली जाते आणि मागच्या दशकात आपण काय काय आणि किती किती साधनसंपत्ती गमावली,नासवली आहे त्याची आकडेवारी ॲनी सांगते.अमेरिका आपल्या हिश्श्यापेक्षा कितीतरी जास्त साधनसंपत्ती वापरतेय,कचरा करतेय हेही ठसवते.अमेरिकेच्या इतर युक्त्याही सांगते.आपल्याकडचं संपत आलं किंवा संपवायचं नसलं म्हणजे 'जा आणि दुसऱ्याचं घ्या ' आपल्याकडे कचरा-प्रदुषण करायचं नसलं म्हणजे 'जा आणि दुसऱ्याकडे ढकला'. पण या युक्त्या आता उपयोगाच्या नाहीत पृथ्वी एकच सलग असल्यानं परिणाम सगळ्यांनाच भोगायला लागतात.हे चित्ररूत येतं.ॲनी बोलतच राहते.मालक- ग्राहकांच्या, खरेदी-विक्री चक्रात ज्यांना काही महत्व नाही अशा स्थानिक लोकांचं विस्थापन आणि शहरात स्थलांतर हेही ठळकपणे येतं.

यानंतर येतं 'उत्पादन'.अतिरेकी उपसा आणि उत्पादनात वापरली जाणारी,वाया जाणारी उर्जा,घातक रसायनांचा वापर,उत्पादन प्रक्रियेतून सोडली जाणारी प्रदुषणकारी रसायनं,कामकऱ्यांच्या(विशेषतः स्त्रीयांच्या) आरोग्याची दिली जाणारी किंमत असं सगळं विशद होतं.पुढच्या पायऱ्या येतात 'वितरण' आणि 'उपभोग'. ग्राहकांनी खरेदी करत रहावं म्हणून किंमती कमी कशा ठेवल्या जातात,दुकानातल्या व्यवस्थेचा खर्चही त्यात कसा भागत नाही,त्यातली छुपी किंमत ग्राहकाऐवजी तिसऱ्या जगातले किंवा साधनसंपन्न् देश कसे मोजतात हे ॲनी समजावते.(यात असेंब्ली लाईन मास प्रॉडक्शनचा मुद्दा मात्र अजिबात येत नाही.)दुसऱ्या महायुध्दानंतर पन्नासच्या दशकात अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पटकन कंडम करता येतील अशा वस्तूंचं उत्पादन सुरू झालं.'पहिलं टाकून नवं घ्या' असा घोष दृक्श्राव्य जाहिरातींच्या सहकार्यानं उत्पादक कंपन्या करू लागल्या.उत्पादनाचं नवीनीकरण करून जुन्याला योजनाबद्धपणे निरुपयोगी ठरवणं म्हणजे planned obsolescenceसुरू झालं.(उपकरणं वापरताना उर्जा बचत व्हावी म्हणून केलेल्या संशोधनातूनही काही उत्पादनं कालबाह्य होतात याची दखल ॲनी घेत नाही)राजकारण्यांनी,सरकारानी उचलून धरल्यानं मग उपभोगाचं चक्र गतिशील झालं.अधिक काम करा,अधिक पैसे मिळवा कारण प्रतिष्ठेसाठी तुम्हाला वस्तू विकत घ्यायच्या आहेत.थकलात तर टीव्ही बघा तो तुम्हाला मॉलमध्ये जायला सांगेल मग जा,त्यासाठी पुन्हा अधिक पैसे मिळवा,अधिक काम करा,अधिक थका.....अशा यडपट चक्रात आपण अडकलोय पण यातून बाहेर पडणं आपल्या हातात आहे.आपली जीवनशैली बदलणं हा त्याला उपाय आहे.हेही ॲनी सांगते.

शेवटची पायरी म्हणजे 'विल्हेवाट'.ही सध्या अमेरिकेतच नव्हे जगात सगळ्यात मोठी डोकेदुखी ठरणारी. आपण प्रत्यक्ष जो कचरा करतो त्याच्या सत्तरपट कचरा त्या वस्तू निर्माण करताना झालेलाच असतो. आपल्याला कळतही नाही तो छुपा कचरा.पुर्नवापर हा उपाय असला तरी तो पुरेसा नाही आणि सगळ्या कचऱ्याला लागूही पडत नाही.असं ॲनी म्हणते.उपभोगवाद,वापरा-फेका वृत्ती आणि बड्या कंपन्यांचे व्यवहार यांच्या बद्दल धोक्याची घंटा वाजवणारा हा लघुपट थोडा प्रचारकी थाटाचा आणि काही प्रमाणात अतिरंजितही वाटतो.पण सुखसोयींना चटावलेल्या,स्थितीशील झालेल्या सधनांना पृथ्वीच्या आरोग्यासाठी गतिशील करायचं तर असा आवाज चढवायची आवश्यकता आहेच.अनेकांपर्यंत तो पोचायलाही हवा आहे.आणि तेच करते आहे 'लाखमालाची गोष्ट'